# एस.पी.आय.टी. पॉलिटेक्निक, कुरुंद येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**कुरुंद, दि. १५ ऑगस्ट २०२६** : संजीवनी प्रतिष्ठान संचलित एस.पी.आय.टी. पॉलिटेक्निक, कुरुंद येथे १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एस.पी.आय.टी. पॉलिटेक्निक, कुरुंद या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व उद्योजक महेश कोतकर होते. कार्यक्रमास एस.पी.आय.टी. पॉलिटेक्निक या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनिलदत्त कापसे, संजीवनी शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी शेटे, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, दोन्ही महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य शिवाजी शेटे यांनी केले आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री महेश कोतकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या निमित्ताने महाविद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीते आणि नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले.

यावेळी प्रा.सुप्रिया वाळूंज यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचे महत्त्व, राष्ट्रप्रेम आणि जबाबदार नागरिक म्हणून आपली कर्तव्ये याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले, प्रा. संदीप जाधव यांनी भारतीय सैनिकांच्या शौर्याची आणि त्यागाची आठवण करून देणारा सीमेवरील एक हृदयस्पर्शी प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडून अक्षरशः उपस्थितांचे अंगावर शहारे आलेत तर प्रा. नितीश शेळके यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमधील देशभक्तीचा उत्साह अधिकच उंचावला. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनिलदत्त कापसे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना शैक्षणिक प्रगतीसोबतच कला, संस्कृती आणि देशसेवेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे स्वातंत्र्य दिनाचा सोहळा अधिकच रंगतदार आणि संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार प्रा. ऋषिकेश दुडे यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितिय वर्ष कॉम्पुटर इंजिनीरिंग च्या विद्यार्थिनी कुमारी प्रांजल उच्चे व प्रतीक्षा जावळे यांनी केले.













S. P. I. T. POLYTECHNIC, KURUN
हर घर
तिरंगा
9-17 ऑगस्ट




Sanjivani Pratisthan, Mumbai Sanchalit
S. P. I. T. POLYTECHNIC, KURUND
Shirur-Nighoj Road, Tal. Parner, Dist. Ahilyanagar Pin - 414306
हर घर
तिरंगा
9-17 ऑगस्ट
vivo Y20G 2021
2026.08.15 10:28




Sanjivani Pratisthan, Mumbai Sanchalit
S. P. I. T. POLYTECHNIC, KURUND
Shirur-Nighoj Road, Tal. Parner, Dist. Ahilyanagar Pin - 414306
हर घर
तिरंगा
9-17 ऑगस्ट


संजीवनी प्रतिष्ठान मुंबई संचलित
संजीवनी प्रतिष्ठान इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक)
संजीवनी शिक्षणशास्त्र महाविद्यालय
कुरुंद, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ४१४३०६



